# मुबारक बेगम - भाग २



मुबारक बेगम यांना आपली जन्मतारीख माहीत नव्हती. परंतु बहुधा ३०/३५ सालच्या दरम्यान राजस्थान मधील झुनझुनू येथे त्यांचा जन्म झाला असावा. ती खूपच लहान असताना त्यांचे कुटुंब अहमदाबाद येथे स्थलांतरित झाले. किराणा घराण्याच्या रियाझुद्दिन खान साहेबासह अनेक उस्तादांकडून त्यांना शास्त्रीय संगीताचे धडे मिळाले. परंतु चित्रपटातील गीते गाण्यासाठी शास्त्रीय संगीताचा रियाज उलट मारक ठरेल असे मुबारक बेगम यांना वाटले आणि हे लक्षात येताच त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण थांबवले आणि सरळ ऑल इंडिया रेडिओवर गाण्यास सुरुवात केली.

त्यांना सुरैय्याचा आवाज खूपच आवडत असे त्यामुळे त्यांनी प्रथम आपल्या दैवतासारखेच गाण्यास सुरुवात केली आणि त्या तिच्यासारखेच छान गात असत. त्यानंतर संगीतकार रफीक गझनवी यांनी रेडिओवरील तिचे गाणे ऐकले आणि तिला चित्रपटात गाण्याची संधी देण्याचे ठरवले. परंतु माईकसमोर त्या खूपच घाबरून गेल्या आणि त्यांना गाणे म्हणताच आले नाही. गाशा गुंडाळून त्यांना घरी परतावे लागले.

त्यानंतर 'ए बेबसी ये मेरा हाल-ए-जार देख तो ले' (तलत - 'अलिफ लैला') या प्रसिद्ध गाण्याचे गुणी संगीतकार श्यामसुंदर यांनी मुबारक यांना पुन्हा संधी देण्याचे ठरवले. पुन्हाही तेच झाले. गाण्याची रिहर्सल चांगली झाली पण गाणे मात्र प्रत्यक्षात गाता आले नाही. पुनःश्च हरी ओम !

परंतु तिसऱ्या वेळी मात्र त्यांचे नशीब उजाडले. संगीतकार होते शौकत दहलवी, चित्रपट 'आईए' आणि गाणे होते 'मोहे आने लगी अंगडाई, आजा आजा बालमा'. माईकची वाटणारी भीती मुबारक यांनी आता मात्र पळवून लावली!

आता काही अडथळाच उरला नाही. आत्मविश्वास बळावला आणि त्या आणि माईक यांच्यातील वैर संपून गेले. परंतु म्हणून लगेचच त्यांना खूप गाणी मिळाली असेही झाले नाही. काही वेळा इतर व्यवसायांतही सर्वांनाच सुरुवातीला नशीब भरभरून देते असे नाही. त्यामुळे त्यांनाही थोडी वाट पहावी लागली आणि परिस्थिती सबूरीने हाताळावी लागली. कमाल अमरोही यांच्या १९५३ साली प्रदर्शित झालेल्या 'दायेरा' या चित्रपटापर्यंतचा काळ असा गेला. ह्या चित्रपटाला जमाल सेन यांचे संगीत होते आणि या चित्रपटातील अनेक गाणी या गायिकेला मिळाली. 'देवता, तुम हो मेरा सहारा, मैने थामा है दामन तुम्हारा' हे रफी (आणि कोरससह) संथ गतीचे भजन तिला प्रथम संधी देऊन गेले.

गंमत म्हणजे त्यांची माईकची भीती नाहीशी झाली तरीही त्यांचा स्वभाव मात्र लाजाळूच राहिला. आत्ताच्या मुबारक बेगम यांना पाहिल्यावर तुम्हाला हे खरंच वाटणार नाही. 'दायेरा' मधील वरील गाणे खूपच गाजल्यावर अमीन सायानी यांना त्यांची रेडिओवर मुलाखत घायची होती तेव्हा त्या म्हणाल्या, 'अमीन साब, मला काही बोलावं पण लागणार का? गाणे म्हणायला सांगाल तर काहीच प्रश्न नाही.' ती मुलाखत वेळेनुसार झालीच. मुबारक यांनी गाणी म्हटली पण त्या वेळी हिंदीतील बऱ्याच चित्रपटांत काम करणाऱ्या त्यांच्या अभिनेत्री बहिणीने - विजयबालाने बोलण्याचे काम केले !

माईकशी दोस्ती झालेला आवाज आणि गाजलेले लोकप्रिय गाणे ह्या पाठबळावर मुबारक जोमाने नवीन काम शोधू लागल्या. काही निर्माते आणि संगीतकारांनी जरी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तरी इतर काहींनी त्यांना गाण्याची संधी दिली. एस्. डी. बर्मन ह्यांना प्रथम तिचा आवाज काहीसा आवडला नाही (तुझ्या आवाजात जरा सफाई आण असे ते म्हणायचे), तरी 'देवदास' चित्रपटाच्या वेळी त्यांचे मत बदलले आणि तिला त्यांनी बोलावून घेतले.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music

that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com